पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. २५
वर्ष ८ वे, अंक ५ वा
किंमत १ रुपया
२१ जून १९९१

शेतकरी संघटक

## निवडणूकांचे निकाल

# 'भारत'भूमीला 'वाफसा' आला आहे

**– शरद जोशी**

१९९१ सालच्या मध्यावधी निवडणुकांचे बहुतेक निकाल जाहीर झाले आहेत. उरलेले निकाल २० तारखेच्या सकाळपर्यंत लागतील. जे निकाल हाती लागले आहेत त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की निवडणुकीच्या निकालात कोणताही चमत्कार नाही. निवडणुका जाहीर झाल्या त्यावेळी, जे निर्णय लागतील असे वाटले होते जवळजवळ तसेच निर्णय थोड्याफार फरकाने लागले आहेत.

एवढा प्रचंड खर्च, दंगे, मारामाऱ्या, रक्तपात, माजी पंतप्रधानांची हत्या, निवडणुका पुढे ढकलणे एवढ्या सगळ्या घटना घडूनही निवडणुकांतून आश्चर्यजनक असे काहीच बाहेर पडले नाही. स्थिर सरकार मिळण्यासाठी लोकांकडे जाऊन पुन्हा एकदा आदेश मागण्याची कल्पना फोल ठरली आहे. मतदारांनी पुढाऱ्यांना पुन्हा एकदा निक्षून सांगितले आहे की तुमच्यापैकी स्पष्ट बहुमत प्राप्त करण्याच्या पात्रतेचा कुणीच नाही; तुम्ही सगळ्यांनी एकत्र बसून देशाचा कारभार चालवावा अशीच लोकांची इच्छा आहे.

भविष्यकाळामध्ये कोणी एखादा अद्वितीय, दैदीप्यमान नेता पुरुष किंवा स्त्री अवतरल्यास पुन्हा कदाचित त्या नेत्याला किंवा त्याच्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळवता येईलही, अन्यथा, एकपक्षीय शासनाचा कालखंड संपला आहे हे स्पष्ट आहे.

> **राजकीय संतुलन झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या आंदोलनात यश मिळणे जास्त सुलभ होणार आहे.**

शेतकरी आंदोलनाने असा दिवस उगवावा यासाठी अट्टाहास धरून प्रयत्न केला. जी भूमी तयार व्हावी यासाठी गेली दहाबारा वर्षे मेहनत घेतली त्या भूमीला वाफसा आला आहे. आता सर्वच पुढारी जवळपास सारख्याच आकाराचे झाले आहेत. आता छोटा चोर मोठा चोर असा भेदभावसुद्धा करण्याचे कारण नाही. राजकीय संतुलन तयार झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या आंदोलनात यश मिळवणे जास्त सुलभ होणार आहे. पण या संधीचा फायदा कष्टकरी घेतात की पुन्हा दुसरे उपटसुंभ 'जातीयवादी' इत्यादि उठून उभे राहतात कोणास ठाऊक!

पक्षांमधील फोडाफोड करण्याचे प्रयत्न होतील. आयाराम गयाराम पुढारी संधी साधण्याचा प्रयत्न करणारच. भारतीय जनता पार्टी आणि डावे पक्ष दोघेही शिस्तबद्ध असल्याने त्यांच्यात फाटाफुटीची शक्यता कमी संभवते. जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चात पक्ष बदलण्याची लागण होण्याची बरीच शक्यता आहे. फाटाफुटीमुळे कदाचित शासनास काही काळ लोकसभेत आपले बहुमत टिकवता येईल. मागचा अनुभव असे सांगतो की हे असले बहुमत फार काळ टिकत नाही.

यापुढे सरकार अल्पमताच्या पक्षाचेच राहणार. एवढेच नाही तर त्याला बाहेरचा पाठिंबा, बांधील असा, मिळणार नाही. राष्ट्रपती भवनात जाऊन आपल्याला पाठिंबा देणाऱ्या खासदारांचे प्रदर्शन मांडणे कोणाही पंतप्रधानास शक्य होणार नाही. शासनात नसलेल्या पक्षांचा पाठिंबा शासनास मिळेल परंतु तो घाऊक किंवा ठोक पद्धतीने मिळणार नाही. प्रत्येक कार्यक्रम, प्रत्येक प्रस्ताव चर्चेला घ्यावा लागेल आणि निदानपक्षी संसदेतील बहुमताचा पाठींबा मिळण्याइतका विरोधी पक्षांच्या मतांचा आदर करावा लागेल. लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने ही अत्यंत शुभ घटना म्हणावी लागेल.

लोकसभा, त्यातील पक्ष आणि खासदार गेली कित्येक वर्षे निव्वळ रबरी शिक्के बनले होते, नवीन व्यवस्थेत त्यांच्यात पुन्हा जीव आल्यासारखे होईल. लोकसभा ही पुन्हा विचार-विनिमयाचा मंच ठरू शकेल.

कोणा एका पक्षाच्या किंवा पंतप्रधानांच्या अरेरावीला काही स्थान उरणार नाही.

एकपक्षीय शासनात भ्रष्टाचारालाही वाव मोठा असतो. कारण भ्रष्टाचाराची माहिती बाहेर फुटण्याची शक्यता कमी असते आणि अशी बातमी फोडण्यात कोणाला फारसे स्वारस्य नसते. एका पक्षाची पकड ढिली झाली की भ्रष्टाचार चालवणे इतके सोपे राहत नाही.

ही सगळी शुभ लक्षणे आहेत पण राजकारणातील पुढाऱ्यांच्या दृष्टींने यात आकर्षक काहीच नाही. राजकारण हा आता फारसा फायदेशीर धंदा राहणार नाही. शासन चालवणे अशक्य आहे असा कांगावा करून पुन्हा एकदा मध्यावधी निवडणुका घडवून आणण्याचा दबाव ही मंडळी राष्ट्रपतींवर आणतील. अशा तऱ्हेच्या वारंवार निवडणुका लोकांना पसंत नाहीत हे ह्या मध्यावधी निवडणुकांतील मतदारांच्या उदासीनते- वरून स्पष्ट झाले आहे. मतदान केंद्रावर जाऊन मत देण्यापेक्षा मतदान केंद्रावर न जाता मतदाराने वारंवार निवडणुका घेण्याविषयी आपले मत नोंदवले आहे. हाताने मतदान करण्याऐवजी बहुसंख्य मतदारांनी आपल्या पायाने मतदान केले आहे. यापुढेही जनतेने वारंवार निवडणुका न घेण्याबद्दल अधिक आग्रही बनले पाहिजे. या लोकसभेची मुदत पुरी होईपर्यंत नवीन निवडणुका होता कामा नयेत. पक्षाचे मान्यवर नेते अहंकारापोटी शासनाची जबाबदारी स्वीकारावयास तयार होत नसतील तर पक्षातील दुसऱ्या फळीच्या नेत्यांना पाचारण करण्याची मुभा राष्ट्रपतींना कोणी नाकारू शकत नाही. येती पाच वर्षे लोकसभेच्या निवडणुका नाहीत, आहेत त्या खासदारांत जे काय चालेल तेच शासन ही एकदा खूणगांठ बांधली म्हणजे लोकसभेचा संसार पाच वर्षे सुरळीत चालेल. सुरुवातीपासूनच नव्या निवडणुका होतात की काय असा चवचाल विचार मनात राहिला म्हणजे संसार धड होत नाही.

शेतकरी आणि कष्टकरी यांच्या संघटनांनी यासाठी विशेष आग्रह धरला पाहिजे. कारण लोकशाही शासनामध्यें हा जो बदल घडत आहे तो श्रमणाऱ्या आणि कष्टणाऱ्यांच्या हिताचा आहे. दुसऱ्याच्या श्रमावर जागणाऱ्यांना एकपक्षीय अनिर्बंध सत्ता अधिक सोयीस्कर आणि आकर्षक वाटणारच. देशाच्या अखंडतेकरिता, सुरक्षिततेकरिता, आर्थिक समस्यांचा सामना करण्यासाठी मजबूत सरकार आवश्यक आहे, असे कांगावे ही सर्व मंडळी करणार आहे. याविरुद्ध कष्टकऱ्यांच्या संघटनांनी आतापासून आवाज उठवला पाहिजे, राष्ट्रपतींना निक्षून बजावले पाहिजे की पुन्हा एकदा निवडणुका घेण्याचा प्रयत्न झाला तर त्याला फार मोठ्या प्रमाणावर विरोध होईल.

निवडणुकांच्या निकालाचा अर्थ काय समजायचा? या मध्यावधी निवडणुकांच्या वेळच्या सगळ्या घटनाच अशा आहेत की निकालांचा एक सलग अर्थ लावणे कठीण आहे. निवडणुकीचा पहिला टप्पा २० मे रोजी पार पडला. दुसरा आणि तिसरा टप्पा २३ आणि २६ मे रोजी पार पडायचा होता. राजीव गांधींची हत्या झाल्यामुळे सर्व निवडणुका तीन आठवड्यांनी पुढे ढकलल्या गेल्या. निवडणुकांच्या प्रतिष्ठेला आयोगाच्या या निर्णयाने मोठा धक्का बसला. निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही त्यापुढे अगदी विशेष परिस्थितीत का होईना, निवडणुकांचे वेळापत्रक बदलता येते हे एकदा मान्य केले की वेळापत्रकात बदल करण्यासाठी, ढवळाढवळ करण्यासाठी संधी शोधण्याचा आणि तयार करण्याचा मोह अनेक पुढाऱ्यांना होणार आहे. निवडणुका पुढे ढकलल्यामुळें नवीन तारखा अगदी पावसाळ्याच्या तोंडाशी आल्या. देशांत अनेक ठिकाणी जून महिन्याच्या पहिल्याच भागात जोरदार पाऊस झाला. देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे त्यामुळे पावसाळ्यात निवडणुका घेऊ नयेत असा आजपर्यंत पाळला गेलेला संकेत या निवडणुकांत दूर ठेवला गेला.

पंधरा सोळा महिन्यांच्या अवधीत निवडणुका आल्यामुळे मतदारांत आधीच उदासीनता होती. पावसाळ्यात मतदानाच्या तारखा आल्यामुळे अनेकांना मतदानास जाण्याची सवड होणे शक्य नव्हते. निवडणुकीत मतदान कमी झाले; कधी नव्हे इतके कमी झाले. पण त्यापलिकडे मतदानात शेतीवर अवलंबून असलेल्यांचा सहभाग विशेष कमी राहिला. या निवडणुकांसाठी वेगवेगळ्या पक्षांनी काढलेल्या जाहीरनाम्यांत शेतकरी आणि शेती हे दोन्ही विषय आधीच बाजूस टाकले गेले होते; मतदानातही शेती आणि शेतकरी बाजूस राहिले.

**शेतकरी आणि शेती जाहीरनाम्यांत नाही आणि मतदानातही नाही.**

राजीव गांधींच्या हत्येच्या आधी झालेले मतदान आणि हत्येनंतर झालेले मतदार यात मोठा फरक पडला. सहानुभूतीची लाट म्हणायची की आणखी काही दुसरे नाव वापरायचे, पण २० मे ते १२ जून या काळात इंदिरा काँग्रेसच्या उमेदवारांना १० टक्क्यांपर्यंत अधिक मते घेता आली हे आकडेवारीने सिद्ध झाले आहे. आंध्रप्रदेशात २० मे रोजी झालेल्या निवडणुकीत तेलगू देशम् अघाडीवर राहिली आणि इंदिरा काँग्रेसचा जवळजवळ सफाया झाला. याउलट १५ जून रोजी झालेल्या मतदानात इंदिरा काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर राहिले. उत्तर प्रदेशात इंदिरा काँग्रेसचा अगदी धुव्वा उडाला. भारतीय जनता पार्टीने तेथे एक तृतीयांशापेक्षा जास्त मते मिळवली. काँग्रेसला फक्त १८ टक्के मते मिळाली. पण जून महिन्यातील मतदानात काँग्रेसला २४ टक्क्यांपर्यंत मते मिळाली. राजीव गांधींच्या हत्येचा आणि त्यामुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्याचा फायदा काँग्रेसला मिळाला हे उघड आहे.

याच्या उलट, या परिस्थितीचा सगळ्यात जास्त तोटा जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चास झाला. राजीवजींच्या हत्येस

जबाबदार कोण आणि द्र. मु. क. चा हात किती याबद्दल बेजबाबदार विधाने करण्यात आली. राष्ट्रीय मोर्च्याच्या नेत्यांच्या घरावर अनेक ठिकाणी हल्ले झाले. या पलिकडे जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चा यांना मतदानाच्या तारखा पुढे ढकलणे फारच महाग पडले. त्यांच्याकडील पैसा आणि साधने आधीच अपुरी. प्रचाराचा कालखंड एकदम दुप्पट झाल्यावर त्यांच्या अनेक उमेदवारांना वाढलेल्या मुदतीत घरी बसून राहण्यापलिकडे गत्यंतर उरले नाही. याचा अप्रत्यक्ष फायदा भा. ज. पा. आणि त्यांचे दोस्त पक्ष यांना झाला.

निवडणूक निकालामध्यें घडलेली एक आल्हाददायक गोष्ट समाजवादी जनता दलाचा सपशेल पराभव. पराभव होणार हे पहिल्यापासून स्पष्टच होते. महाराष्ट्रात काही

**शेतकरी आंदोलनाच्या दृष्टीने देवीलाल यांचे पानिपत खरोखरच आल्हाददायक घटना आहे.**

नेते नोटांनी भरलेल्या बॅगा घेऊन फिरले तरी त्यांच्या एकाही उमेदवाराची अनामत रक्कम वाचण्याचीसुद्धां काही शक्यता नाही हे पहिल्यापासूनच स्पष्ट होते. निकालात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच घडले नाही. सर्व भारतात मिळून पाचाच्यावर सहावा उमेदवार निवडणून येणे कठीण होते हेही स्पष्ट होते. पण निकालात आणखी एक आनंददायक भाग म्हणजे चौधरी देवीलाल यांचा रोहटक मतदार संघात पराभव झाला. विधानसभा मतदारसंघातही एका सामान्य उमेदवारांने त्यांना धूळ चारली. शेतकरी आंदोलनाच्या दृष्टीने ही फार महत्त्वाची घटना आहे. गेली चार वर्षे देवीलालपद्धतीच्या विचारसरणीने शेतकरी आंदोलनाच्या मार्गात मोठी धोंड उभी केली होती. जातीचे राजकारण करायचे. त्याच्या आधाराने सत्ता हाती घ्यायची, आव मात्र शेतकऱ्यांच्या कैवाराचा आणायचा. प्रत्यक्षात करायचे काहीच नाही. पण पंचतारांकित हॉटेलात शेतकऱ्यांना २०० रु. चे जेवण १०० रु. त मिळण्याची सवलत देणे असले आचरट कार्यक्रम राबवले. असली माणसे आणि प्रवृत्ती क्षणभर तरी टिकून राहतात हेच आश्चर्य! पण या प्रवृत्तीने गेली चार वर्षे शेतकरी आंदोलनात कठोर व्यत्यय आणला. या देवीलाल यांच्या उमाळ्यापोटीच महेंद्रसिंह टिकैत आणि इतर काही जणांनी वाढत्या ताकदीच्या शेतकरी चळवळीस मोडता घालायचा प्रयत्न केला. निवडणुकांच्या या निकालामुळे देवीलाल संपले. महेंद्रसिंह टिकैत आणि त्यांचे साथीदार खुलेआम भा. ज. पा. ला पाठिंबा देत आहेत. त्यांचा देव त्यांचे भले करो, पण शेतकरी आंदोलनाच्या दृष्टीने देवीलाल यांचे पानिपत ही खरोखरच आल्हाददायक घटना आहे.

महाराष्ट्रातील इंदिरा काँग्रेस आणि शरद पवार हे तर विशेष भाग्याचे. महाराष्ट्रात मे महिन्यात मतदान झालेच नाही; सगळे मतदान जूनमध्येच. या मधल्या काळात राजीव गांधी दूर झाल्यामुळें शरद पवारांचे पक्षातील स्थान पक्के झाले, एवढेच नव्हे तर हिमालयाच्या मदतीला सह्याद्रीने जाण्याची भाषा पुन्हा चालू झाली. भारताच्या राजकारणात फारा वर्षांनी महाराष्ट्राला काही स्थान मिळेल या कल्पनेने अनेकांना बरे वाटले. त्याचाही फायदा इंदिरा काँग्रेसला निश्चित मिळाला.

निकालाची चर्चा करताना मे आणि

**'जळके' बी.ए. च्या धर्तीवर इंदिरा काँग्रेसचे 'रडके' खासदार.**

जून महिन्यात झालेल्या मतदानाला एकाच मापाने कसे तोलता येईल? १९३५ सालच्या आसपास एका वर्षी मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या बी.ए.च्या परीक्षेच्या एका विषयाच्या उत्तरपत्रिका आगीत जळून खाक झाल्या; त्याचा गवगवा नको म्हणून विद्यापीठाने सर्वच परीक्षार्थीना उत्तीर्ण करायचे ठरवले. पण ही बातमी बाहेर फुटलीच आणि त्या वर्षी बी.ए. पास झालेल्या विद्यार्थ्यांना कुचेष्टने जळके बी.ए. म्हणतात. जून महिन्यातील मतदानात निवडून आलेले इंदिरा काँग्रेसचे खासदार असल्याच प्रकारात मोडतात. 'जळके' बी.ए. च्या धर्तीवर त्यांना 'रडके' खासदार म्हणायला हरकत नाही.

हा फरक राजीव गांधी यांच्याविषयी किंवा त्यांच्या कुटुंबियांविषयी वाटणाऱ्या अनुकंपेमुळे झाला की हत्येच्या आघातामुळे काँग्रेस कार्यकर्ते खडबडून जागे झाल्यामुळे झाला, का लांबलेल्या मुदतीत साधने पुरवण्याची ताकद काँग्रेस मधेच आहे म्हणून, की या तिन्ही कारणांनी झाला? आकडेवारी वरून असे दिसते की इंदिरा काँग्रेस पक्षास मिळालेल्या मतांत स्त्रियांच्या मताचा वाटा पुरुषांच्या मतांच्या वाट्यापेक्षां जास्त आहे. यावरून अनुकंपा लाट काही प्रमाणात परिणामकारक ठरली असा निष्कर्ष काढला तर तो वावगा ठरू नये.

हे लक्षात घेता उरलेल्या निकालांचा अर्थ काय? इंदिरा काँग्रेसने दक्षिणेत आपले स्थान मजबूत केले आहे. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक या राज्यांत काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांचे एकसंध नेतृत्व मानले गेले आहे. महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशातही काँग्रेसचेच प्राबल्य आहे.

उत्तरेतही राजस्थान, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांत काँग्रेसने लक्षणीय यश मिळविले आहे. उत्तरप्रदेश आणि गुजराथ येथे भा. ज. पा. समोर त्यांना हार खावी लागली आणि बिहारमध्ये जनता दलाने विजय मिळवला. पूर्व बंगालमध्यें मार्क्सवाद्यांनी आपले स्थान अढळ ठेवले. उत्तरप्रदेश, बिहार, आणि गुजराथ ही तीन राज्ये सोडल्यास उत्तरेही काँग्रेसने आपले वर्चस्व बसवले आहे. पण उत्तर प्रदेश आणि बिहार ही साधीसुधी राज्ये नाहीत. एकूण खासदारांच्या संख्येपैकी एक चतुर्थांश खासदार या दोन राज्यांतूनच निवडले जातात. मंदिराचा प्रश्न शिलगावून देतांना अयोध्येची निवड का झाली, द्वारकेची का नाही याचा उलगडा निवडणुकांच्या या

अंकगणितात होतो.

भा. ज. पा. आणि त्यांचे मित्र यांनी भारतीय राजकारणात प्रबळ स्थान मिळवले आहे. कदाचित् संख्येच्या दृष्टीने राष्ट्रीय मोर्चा भा. ज. पा. पेक्षा वरचढ असेलही पण राष्ट्रीय मोर्चा हा अठरा धान्यांचे कडबोळे आहे. भा. ज. पा. हा एक शिस्तबद्ध पक्ष

**बापूंचा गुजराथ आणि नथुरामचे पुणे यांचा हा संगम मोठा विदारक आहे.**

आहे. म्हणजे काँग्रेसच्या खालोखाल देशाच्या राजकारणात आता भा. ज. पा. चे स्थान तयार झाले एवढेच नव्हे तर काँग्रेस विरोधी आघाडीची भाषा बाजूला सरून भा. ज. पा. विरोधी आघाडीची भाषा सुरू झाली आहे. यावरून भा. ज. पा. चे स्थान किती महत्त्वाचे झाले आहे हे लक्षांत यावे.

पण भारतीय जनता पार्टीस कोणकोणत्या राज्यांत यश मिळाले हे पाहिले तर नवलच वाटते. अयोध्या उत्तर प्रदेशात आहे. पण खुद्द अयोध्या आणि अलाहाबाद येथे भाजपाची डाळ शिजली नाही. त्यांचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आले ते पश्चिमी उत्तर प्रदेशमध्ये, म्हणजे महेंद्रसिंग टिकैत यांच्या भूमीत. त्यानंतर भाजपाला यश मिळाले ते गुजरातमध्ये. महात्मा गांधींबद्दल आपुलकी, प्रेम, आदर आणि अभिमान बाळगणाऱ्या गुजरातने जातीयवादी भाजपाच्या पाठीमागे उभे राहावे हे दुर्दैव तर खरेच, पण त्यात एक भीषण विनोदही आहे. पुण्याचे भाजपाचे उमेदवार अण्णा जोशी निवडून आल्याचे जाहीर झाले आणि सगळीकडे निघते तशी गुलालफेकीची मोठी मिरवणूक निघाली. त्यात अण्णा जोशींच्या जयजयकाराच्या घोषणा होत्याच. पण त्याचबरोबर मोठी ठळक घोषणा 'नथुराम गोडसे अमर रहे ।' अशी होती. बापूंचा गुजराथ आणि नथुरामचे पुणे यांचा हा संगम मोठा विदारक आहे.

सुदैवाने महाराष्ट्रात भाजपा-शिवसेनेच्या पसरत्या साथीला चांगला आवर बसला आहे. किंबहुना, निवडणुकीच्या निकालात त्यातल्या त्यात आनंदाची अशी एक बाब की शिवसेनेचा माज उतरला आहे. महाराष्ट्रातील या घटनेस अनेक कारणे आहेत. जनता दल महाराष्ट्रात नगण्य असल्यामुळे विरोधी मतांची फारशी फाटाफूट झाली नाही. आणि बहुतेक ठिकाणी इंदिरा काँग्रेस विरुद्ध युती असा सामना झाल्याने जातीयवादी तत्त्वांना आवर बसला. पण याहीपेक्षां एक कारण जास्त महत्त्वाचे असावे. मुंबई उच्च न्यायालयाने एका मागोमाग एका निर्णयात शिवसेना आमदार- खासदारांच्या निवडणुका रद्द ठरवल्या. एवढेच नव्हे तर 'गर्व से कहो हम हिंदू हैं।' हे निवडणुकीतील प्रचारवाक्य आग्राह्य ठरवले. न्यायालयाच्या निर्णयांच्या आधाराने निवडणूक आयोगासमोर शिवसेनेची मान्यताच रद्द करण्याचा प्रस्ताव सुनावणीसाठी घेण्यात आला आहे. आणि या प्रकरणाची सुनावणी निवडणुकीनंतर लगेच होणार आहे. या दोन्ही घटनांमुळे युतीच्या प्रचाराची शैली बदलली. 'आम्ही' कोणाला मानीत नाही, कोर्टाचेही 'ऐकणार नाही' अशी गुर्मीची भाषा बंद पडून अगदी बाळासाहेब ठाकरेंची भाषणेसुद्धां युक्तीयुक्तीने आणि मोजून मापून होऊ लागली. काही ठिकाणी काही मुद्द्यांवर बेताल विधाने केली गेली पण एकूण सावधगिरीचा नवा पवित्रा शिवसेनेस घेणे भाग पडले. त्यामुळे त्यांच्याभोवती तयार झालेले खोटे तेजोवलय गळून पडले. कुणाची भीडमुर्वत न ठेवता परखडपणे बोलणारे सेनापती शेवटी काव्याकाव्यानेच हिंमत दाखवतात हे अनेकांनी डोळ्यांनी पाहिले आणि कानांनी ऐकले. या वाघात मोहरमच्या वाघापेक्षां शौर्य नाही याची जाणीव लोकांस होऊ लागली. आणि बेलगाम अफाट भाषणे करणाऱ्या साध्वी आणि संन्याशी यांच्या ताफ्यानेही फारसा फरक पडला नाही. पंचवीस तीस जागा मिळवण्याच्या वल्गना करणारे आठ-दहा जागांवर येऊन ठेपले. लोकन्यायालयालाच मानण्याची भाषा करणाऱ्याला लोकांनी तर आपला निर्णय दिलाच पण आता काही आठवड्यांतच न्यायालयाचा आणि निवडणूक आयोगाचा याबद्दलचा निर्णय लागेल आणि महाराष्ट्राला लागलेली ही कीड संपून जाईल अशी आशा करायला हरकत नाही.

देशपातळीवर भा.ज.पा.ही जास्त जबाबदारीने वागू लागेल अशी चिन्हे दिसत आहेत. अयोध्येचे राममंदीर प्रकरण कसे निकालात काढावे या संबंधी भा.ज.पा. ची नेते मंडळी आता सौम्य भाषा वापरू लागली आहेत; सामंजस्याने किंवा न्यायालयाच्या निर्णयानुसार हा प्रश्न सोडवला पाहिजे असे म्हणू लागली आहेत. हीच भूमिका घेणाऱ्या विश्वनाथ प्रतापसिंग सरकारच्या भूमिकेविरुद्ध भा.ज.पा. च्या याच नेतेमंडळींनी आकांडतांडव केले होते. उत्तर प्रदेशचे शासन चालविण्याची जबाबदारी येऊन पडते आहे हे पाहताच त्यांच्या अतिरेकीपणाला लगाम बसताना दिसतो. भा.ज.पा. जातीय प्रश्नावर ऐतिहासिक कारणाने बदनाम आहे. ती दुष्कीर्ती दूर करणे त्यांना सहजपणे जमणार नाही. पण केन्द्रातील नवीन राजकीय परिस्थितीत भा.ज.पा. चे परिवर्तन असंभव नाही. इंदिरा काँग्रेसने भा.ज.पा. विरुद्ध कितीही हाकाटी केली तरी परिस्थितीत बदल घडणारच नाही असे नाही. संभाव्य पंतप्रधानांच्या यादीत माधवराव शिंदे यांचे नाव जवळजवळ अग्रक्रमाने आहे. शिंदे घराण्यातीलच दुसऱ्या दोन व्यक्ति भा.ज.पा. च्या मान्यवर नेत्या आहे. घरात पंतप्रधानपद येत असतांना किरकोळ सैद्धांतिक वाद घालण्याची भारतीय पुढारी मंडळीत परंपरा नाही. यापूर्वीही काँग्रेसने सोयीस्कर पडेल तेव्हा अगदी शिवसेनेशीही चुंबाचुंबी केली आहे. तर बदलत्या राजकीय परिस्थितीत नवीन भा.ज.पा. शी सौहार्दाचे संबंध ठेवणे काही अशक्य नाही.

जनता दलाच्या आणि इतर पक्षांच्या मंडळींनीही भा.ज.पा. शी अगदी जवळचे स्नेहसंबंध ठेवले आहेत. ३० ऑक्टोबरच्या

खडाष्टकाचा विसर पडायला कदाचित् काही वेळ लागेल परंतु आम्ही त्यांच्या पंक्तीला अजिबात बसणारच नाही या घोषणांत तथ्यापेक्षां नाटकच जास्त! मग इंदिरा काँग्रेस आदि पक्ष आणि भा.ज.पा. यांचे एकमेकांचे संबंध आहेत तरी कसे? इंदिरा काँग्रेसचे नवे अध्यक्ष श्री. नरसिंह राव यांनी अध्यक्षपदावर येतायेताच एक मोठी चांगली मुलाखत पत्रकारांना दिली. सर्वसाधारणपणे काँग्रेस अध्यक्षांच्या मुलाखती इतक्या नीरस आणि रटाळ असतात की त्या वाचवतसुद्धां नाहीत पण रावसाहेबांनी ही मुलाखत निदान वाचनीय होती, चुरचुरीत होती यात काही शंका नाही. या मुलाखतीत नव्या अध्यक्षांनी एक मुद्दा मांडला. 'काँग्रेसला पर्याय फक्त फॅसीझमच आहे.' फॅसीझम शब्दास मराठी भाषेत पर्यायी शब्द नाही. पण राष्ट्राचे नाव घेणारी आणि सुस्थापितांचे रक्षण करणारी म्हणजे फॅसीझम. रावसाहेबांच्या म्हणण्याचा अर्थ असा की काँग्रेस हरली तर देशावर भा.ज.पा. फॅसीझमचे राज्य सुरू होईल.

भा.ज.पा. त काही उदारमतवादी सज्जनही आहेत पण त्यांचीही भाषा आणि वर्तणूक पाहिली तर काही काळातच शिवसेना, विश्वहिंदू परिषद, बजरंग दल असल्या खुलेआम झुंडशाही संघटना त्यांच्यावर ताबा मिळवतील हे स्पष्ट दिसते. लोकशाहीची उघडउघड चेष्टा करणारी मंडळी नेतेपदी आहेत. उघड उघड गुंड वापरण्याची भाषा आजही ते करतात. मुसलमान चांगला असला तरी पारखून घेतला पाहिजे, कारण अवलाद कुणाची अशी भाषा वापरतात. अडवाणी, प्रमोद महाजन, बाळ ठाकरे ही फॅसीस्ट मंडळी आहेत यात काही शंका नाही.

पण त्यांच्यावर टीका करण्याचा काँग्रेसला काय हक्क आहे? खोटा राष्ट्रवाद आणि हुकुमशाही हे फॅसीझमचेच दोन घटक. हुकुमशाहीत काँग्रेस काही कुठे कमी पडली नाही. जेव्हा जेव्हा जेथे जेथे बळाचा वापर आवश्यक किंवा सोयीस्कर होता तेथे तेथे काँग्रेस शासनाने बळाचा वापर करून जनआंदोलने मोडून काढली आहेत. आणिबाणी हे अशा हुकुमशाहीचे एक उदाहरण. इतर काही देशांतील हुकुमशाहीप्रमाणे काँग्रेसला बेबंद हुकुमशाहीचा दरारा तयार करावा

**जोतिबा फुलेंच्या 'एकमय लोक' या अर्थाने भारताची स्थापना करण्याची सुवर्णसंधी.**

लागला नाही हे खरे पण त्याचे श्रेय भारतांतील लोकशाही परंपरेला आणि लोकांच्या समजूतदारपणाला आहे. इतर काही हुकुमशहांप्रमाणे भर रस्त्यात शेकडो तरुणांना डोळे बांधून, उघडे करून त्यांच्यावर गोळीबार करण्याचे प्रकार काँग्रेस राज्यांत फारसे घडले नसतील (तेलंगण, नक्षलवादी, पंजाब, कश्मिर, आसाम यासारखे अपवाद सोडता.), पण विक्राळ विदेशी हुकूमशहांनाही न जमलेली गोष्ट काँग्रेसने सहज करून दाखवली. घराण्याची सत्ता तयार करणे अगदी स्टॅलीनलाही जमले नाही. पण राजीव गांधींच्या हत्येनंतर पंतप्रधानपदास प्रियांकाच्या नावाची गंभीरपणे चर्चा व्हावी इतकी बेबंद घराणेशाही काँग्रेसने प्रत्यक्षात दाखवली. या बाबतीत काँग्रेस आणि भा. ज. पा. यांत डावे उजवे करण्यासारखे काही नाही. भा. ज. पा.ने हिंदूराष्ट्राची घोषणा देऊन सर्वसामान्य जनतेचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसनेही आजपर्यंत हेच केले. नाव राष्ट्राचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्राला एकविसाव्या शतकात नेण्याचे, विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आणण्याचे, पण या खोट्या घोषणांच्या आवरणाखाली काँग्रेसने वास्तवात फक्त 'इंडिया'चे हितसंबंध जपण्याचेच काम केले आहे. काँग्रेस आणि भा.ज.पा. दोन्हीही फॅसीस्टच. 'इंडिया' – अर्थशास्त्राचा पराभव होतो आहे असे पाहिल्यानंतर अधिक मागासलेली पण परंपरेच्या कारणाने लोकांच्या मनास अधिक भिडणारी धर्मराष्ट्र संकल्पना भा.ज.पा. ने पुढे केली. व त्यासाठी काँग्रेसपेक्षाही जास्त झुंडगिरी वापरण्याची तयारी केली. भा. ज. पा. आणि काँग्रेस दोघे फॅसीस्टच. काँग्रेसला जे जमले नाहीत ते वेगळ्या मार्गाने पुरे करण्यासाठी भा. ज. पा. पुढे येत आहे.

निवडणुकांचे निकाल लागतानाची परिस्थिती ही अशी आहे. सर्व पक्ष 'इंडिया' वादी. सर्व पक्ष, आवश्यक तर सर्व ताकद वापरून, सध्याची शोषणव्यवस्था चालू ठेवण्यात स्वारस्य असलेली, ही सर्व मंडळी आता जवळ जवळ सारख्याच ताकदीची झाली आहे. फारसा लोकक्षोभ होऊ देणे त्यांना कोणालाच परवडण्यासारखे नाही. इंडिया आणि हिंदू राष्ट्र या दोन्ही बेगडी राष्ट्रवादांना बाजूला करून जोतिबा फुलेंच्या एकमय लोक या अर्थाने भारताची स्थापना करण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना ही सुवर्णसंधी आहे संधी हातात घेण्याची हिंमत त्यांनी दाखवली तर!

**१८ जून १९९१**

●●●●●

# चंडीगढ जेलभरो : एक अनुभव

**राजकुमार झोटिंग, खडकी (यवतमाळ)**

चंडीगढ येथील जेलभरो आंदोलनाची सुरुवात १५ मे पासून होणार आहे अशी माहिती मी १३ मे रोजी परीक्षा आटोपून यवतमाळ कृतिसमितीच्या सदस्य सौ.संध्याताई इंगोले यांना भेटण्यासाठी आलो तेव्हा कळली. यवतमाळला आलो तर संध्याताईंच्या घराला कुलूप होते. शेजाऱ्यांकडून कळले की पंजाबातील आंदोलनात भाग घेण्यासाठी संध्याताई ३ वाजताच्या गाडीने वर्ध्यावरून निघणार आहेत. पंजाबमधील आंदोलनाची बातमी ऐकताच मनात एकदम स्फूर्ती निर्माण झाली आणि शहीद झाले तरी चालेल परंतु या आंदोलनात सहभागी झालेच पाहिजे असा मनाशी निश्चय केला आणि लगेच माझ्या गावी – खडकीकडे निघालो. दहापंधरा मिनिटांत तयारी करून हिंगणघाटवरून रात्रीची साडेदहाची मेल पकडण्याकरता निघालो तेव्हा घरातील सर्वजण आणि गावातील मंडळी मला पंजाबमध्ये जाऊ द्यायला तयार होत नव्हती. पंजाबातून परत येणे कठीण आहे, तिथे रोज पन्नास माणसं मारली जातात असे म्हणून माझ्या मनात भीती निर्माण करीत होती. पण मी हिम्मत न सोडता घरी आईवडिलांनी 'चंडीगढला फक्त मीटिंग आहे, दोन-तीन दिवसात परत येतो' असे सांगून हिंगणघाटला निघालो. हुरहुरत्या मनाने हिंगणघाटला पोहोचल्यावर स्टेशनजवळ राहाणारे शेतकरी संघटना तालुकाप्रमुख श्री. भास्कराव इंगोले यांची भेट घेतली. त्यांनी मला धीर दिला व प्रवासाची योग्य ती माहिती देऊन रेल्वेत बसवून दिले.

आणि मी एकटाच १५ मे रोजी सकाळी १० वाजता चंडीगढला पोहोचलो. रेल्वेच्या खाली उतरल्यावर जिकडेतिकडे शस्त्रधारी शिपाई दिसत होते. थोडा वेळ मी घाबरून गेलो होतो. मग पुन्हा हिम्मत करून एक ऑटोरिक्षा करून किसानभवनाकडे निघालो. वाटेत सगळीकडे बंदूकधारी शिपाई – जीपमधून, बसमधून, रस्त्याच्या कडेला उभे असलेले दिसत होते. मी ११ वाजता किसान भवनात पोहोचलो तेव्हा आदल्या दिवशी तेथे पोहोचलेले महाराष्ट्रातील कार्यकर्ते विजयभाऊ जावंधिया, किशोरभाऊ माथनकर, भास्करराव बोरावके, सौ. संध्याताई इंगोले, सुमनताई अग्रवाल वगैरे भेटले तेव्हा माझ्या मनाला हायसे वाटले.

नंतर १२ वाजता दोनतीन शीख सरदार आमच्या खोलीत आले व त्यांनी आदरातिथ्याने भोजन करण्यासाठी आम्हा सर्वांना कँटीनमध्ये नेले. भोजन झाल्यावर त्यांनी आणलेल्या छोट्या ट्रकमधून आम्ही परेड ग्राऊंडवर गेलो. तेथे हरियाणा व पंजाबमधील शेतकरी जमले होते. तेथे विजय जावंधिया व भूपेंद्रसिंग मान यांची भाषणे झाली. नंतर आमचा मोर्चा शिस्तीने नारे लावत राजभवनाकडे निघाला. राजभवनाजवळ आम्हाला पोलिसांनी अडवून अटक केली व तेथून तुरुंगात रवानगी केली.

तुरुंगात अतिरेकी वगैरे दिसत होते. पहिल्या दिवशी तर त्यांच्या विषयी भीती वाटत होती. दुसऱ्या दिवशी BA III झालेला एक अतिरेकी कैदी मात्र भेटला आणि त्यानेच 'आपण कुठून आलात, कशासाठी जेलमध्ये आलात' इत्यादि प्रश्न अगदी सभ्य आणि आपुलकीच्या भाषेत विचारले. मी त्यांना शेतकऱ्यांची समस्या, शेतकऱ्यांवर होणारे अन्याय, शेतीमालाचा भाव इत्यादि प्रकारची माहिती सांगितली.

मी सुद्धा त्यांना काही प्रश्न विचारले. त्यांनी सांगितले की आमचेसुद्धा एक आंदोलनच आहे; जोपर्यंत पंजाब वेगळा मिळणार नाही तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही. मी म्हटले, वेगळ्या पंजाबच्या नावावर कितीतरी निष्पाप लोकांचे बळी जात आहेत; देशाचे तुकडे पाडून काय उपयोग? त्यावर त्यांनी उत्तर दिले की, आम्ही निष्पाप किंवा सामान्य नागरिकांचे मुळीच हाल करीत नाही किंवा जीवसुद्धा घेत नाही. आमच्यापासून त्यांना कोणताच त्रास नाही. पण सरकार आमच्या विरोधात जनमत तयार करण्यासाठी अशा अफवा पसरविते आणि दहशतीचे वातावरण निर्माण करते.

मी त्यांना विचारले, जर पंजाब वेगळा दिला तर येथील गरिबी दूर होईल का? मग देशाचे तुकडे कशासाठी पाडायचे?

तर त्यांनी म्हटले, आमची तशी मुळीच इच्छा नाही. या देशाला आजाद करण्यासाठी सर्वात जास्त शीख बांधवांनी कुर्बानी दिली आहे, ते आम्ही शीख बांधव या देशाचे तुकडे पाडीत आहोत हे म्हणणे चुकीचे आहे. परंतु आमचा नाइलाज आहे कारण या देशात आम्हाला शीख म्हणून राहाणे कठीण झाले आहे. आमच्या मातापित्यांना, भावांना सरकारने विनाकारण दहशत निर्माण करून निष्पाप मारले आहे. आमच्यावर अत्याचार झाला आहे. आम्हाला जर या देशात संरक्षण मिळत नसेल तर काय उपयोग?

मी त्यांना शेतकरी संघटनेच्या विचारांची माहिती दिली तेव्हा ते म्हणाले की शेतकरी संघटनेचे आंदोलन योग्य आणि शांततामय आहे. मी त्यांना 'समस्याएँ भारत की' व 'किसान संगठन : विचार और कार्यपद्धती' ही पुस्तके वाचायला दिली होती.

पंजाबमधले शेतकरी एकदम साधेभोळे होते. आम्ही दहा दिवस चंडीगढजेलमध्ये त्यांच्या सोबत वावरलो तेव्हा त्यांच्या बोलण्यातून सन्माननीय उच्चार निघत होता. त्यांच्या सहवासात मला असे वाटत नव्हते की आपण पंजाबात आलो आहोत; मला तर आपण आपल्या गावातील, महाराष्ट्रातील नातेवाईक मंडळींतच आहोत असे वाटत होते.

तेथील शेतकऱ्यांनीसुद्धा आपल्या काही समस्या सांगितल्या. तिथे हरितक्रांती झाली असली तरी हरितक्रांतीच्या नावावर मोठ्या प्रमाणावर 'कर्जक्रांती' झाली आहे. त्यांच्या शेतात जास्त पिकत असले तरी त्यांच्या गव्हाला,

**(पान १२ पहा)**

# राष्ट्रीय कृषिनीती

## प्रास्ताविक

### कृषिनीतीचा अभाव

१. स्वातंत्र्यानंतर चार दशके उलटूनही भारतामध्ये रीतसर व सर्वकष कृषि नीती मांडली गेली नाही हा अपघातही नाही आणि नजरचूक तर नाहीच नाही. अशा धोरणाचे निवेदन एक तर निखालस असत्य तरी असते, नाही तर राजकीय गैरसोयीचे ठरले असते.

२. शेतीविषयक धोरणासंबंधी काही निवेदने किंवा घोषणा आजवर झाल्याच नाहीत असे नाही. खरे तर, अशी निवेदने बरीच झाली; काही जमिनीच्या फेरवाटपासंबंधी, काही या किंवा त्या शेतीउपयोगी सामुग्री (निविष्ठा) संबंधी, काही संरचनेसंबंधी तर काही तंत्रज्ञानासंबंधी. अन्नधान्याच्या धोरणाविषयी घोषणा तर भरपूर झाल्या. पण त्यांतून धोरणाऐवजी धोरणाचा अभावच स्पष्ट होतो. या धोरणांत सार्वजनिक वितरण व्यवस्थेला आवश्यक अन्नधान्य पुरवठा कसा करता येईल याची चिंता वाहिली आहे आणि तोंडी लावणे म्हणून शेतीतील उत्पादन आणि उत्पादकता यांविषयी उल्लेख आलेले आहेत. देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेत आणि तिच्या विकास- प्रक्रियेमध्ये शेतीव्यवसायला त्याचे योग्य स्थान निश्चित करणारे धोरण कधी मांडलेच गेले नाही.

### केवळ अन्नधोरण

३. चिंता एकच, येन केन प्रकारेण अन्नधान्य पुरवठा चालू ठेवणे आणि आली वेळी निभावून नेण्यासाठी जुजबी कार्यक्रमांनी ही ऱ्हस्व दृष्टी, कदाचित् समजण्यासारखी आहे. कारण, अन्नधान्य तुटवडा आणि दुष्काळ यांनी वर्षोनुवर्षे ग्रस्त झालेला आपला देश. त्यात १९३७ साली ब्रह्मदेश विभक्त झाल्यामुळे तांदुळाचा पुरवठा घटला आणि भरीतभर दहाच वर्षांनी झालेल्या फाळणीमध्ये पश्चिम पंजाबसारखे धान्याचे कोठार हातचे गेले. यामुळे अन्नधान्याच्या बाबतीत अत्यंत बिकट परिस्थिती उभी राहिली होती.

४. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जबरदस्तीच्या धान्यवसुलीच्या सरकारी धोरणामुळे निर्माण झालेल्या दुष्काळात लाखो माणसे उपाशी मेली. तेव्हासुद्धा वसाहतवादी इंग्रज शासनाने कृषिधोरण मांडण्याचा विचार केला नव्हता. जानेवारी १९४६ मध्ये प्रथमतः इंग्रज सरकारने "भारतातील शेती व अन्नविषयक धोरणाचे निवेदन" केले. या निवेदनाचे नाव जरी मोठे भारदस्त असले तरी, वास्तवात, उद्दिष्ट मर्यादितच होते.

> "………लोकांच्या कल्याणास चालना देणे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्याची क्रिया सुरू करणे. त्यासाठी सर्वांना पुरेशा आणि योग्य दर्जाच्या अन्नाचा पुरवठा करणे."

५. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरसुद्धा "अधिक धान्य पिकवा" ही घोषणा शासनाच्या शेतीविषयक धोरणांचा गाभा बनून राहिली. रेशनींगच्या मार्गाने लोकांना स्वस्त किंमतीत अन्नधान्य पुरविण्याची जबाबदारी शासनाने युद्धकाळात स्वीकारली होती ती युद्धानंतरही शासनाच्या डोक्यावर परंपरेने आली आणि ती निभावण्याच्या हेतूने १९४३, १९४७, १९५०, १९५७ साली एकापाठोपाठ एक समित्यांची नियुक्ती केली. अन्नपुरवठ्यासंबंधी अनेक उपाय करून पाहिले. अगदी रेशनींग पूर्णपणे बंद करण्यापासून ते अन्नधान्य व्यापाराच्या सरकारीकरणापर्यंत; धान्याची प्रचंड प्रमाणावर आयात करण्यापासून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविण्याचे प्रयत्न करण्यापर्यंत. सरतेशेवटी, लालबहादूर शास्त्रींच्या शासनाने नवीन उपाय म्हणून, मर्यादित प्रमाणात का होईना आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रोत्साहनाचा प्रयोग केला. त्या प्रयोगाला यश येऊन अन्नधान्याच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आणि त्यामुळे अन्नधान्यसमस्य व परदेशांवरील अवलंबनापासून थोडी फार सुटका झाली.

६. पी एल् ४८० योजनेखाली आयात करून अमर्याद अन्नधान्य उपलब्ध होण्याची शक्यता गृहित धरून देशातील शेतीकडे सुरुवातीला काणाडोळा केला तरी चालेल असा काही नियोजनतज्ज्ञांनी ग्रह करून घेतला. तसेच, वायव्य भारतात यशस्वी झालेल्या हरित क्रांतीमुळे अवाजवी आत्मसंतुष्टताही निर्माण झाली. परिणामतः, देशासाठी रेखीव आणि ठाशीव

### ● शरद जोशी कृषिनीती ●

**शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांच्या अध्यक्षतेखालील कृषिसल्लागार समितीने केंद्रशासनाच्या कृषिमंत्रालयाने तयार केलेल्या कृषिधोरणाच्या मसुद्याला मान्यता न देता राष्ट्रीय कृषिनीतीचा पर्यायी मसुदा तयार केला. २२ मार्च १९९१ रोजी त्यावेळच्या काळजीवाहू सरकारचे कृषिमंत्री श्री. देवीलाल यांनी घाईघाईने आपल्या खास सहाय्यक अधिकाऱ्यांमार्फत 'राष्ट्रीय कृषिनीती' या संकल्पनेलाच छेद देणारे एक जुजबी कृषिधोरण जाहीर करून श्रेय पदरात पाडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे श्री. शरद जोशी यांनी आपल्या समितीचा मसुदा जाहीर केला. किसान समन्वय समितीच्या सदस्यांमार्फत सर्व राज्यांच्या शेतकऱ्यांपुढे हा मसुदा मांडण्यात आला. तसेच, सर्व प्रमुख राजकीय पक्षांकडेही तो पाठविण्यात आला.**

**राज्याराज्यातील शेतकरी संघटनांनी स्थायी कृषिसल्लागार समितीच्या या मसुद्याला 'शरद जोशी कृषिनीती' असे नाव दिले असून ती अमलात आणण्यासाठी शासनाला भाग पाडणे हे आपल्या चळवळीचे उद्दिष्ट ठरविले आहे. या मसुद्याच्या गुजराथी व हिंदी भाषांतराचे काम सुरू झाले आहे. १५ मे रोजी चंडीगढ येथे झालेल्या जेल भरो आंदोलनात "शरद जोशी कृषि नीती अमलात आलीच पाहिजे" ही प्रमुख घोषणा होती. तुरुंगातील सर्व चर्चा या कृषिनीतीच्या अनुषंगानेच होत होत्या.**

**'राष्ट्रीय कृषिनीती'चे मराठीतील स्वैर रूपांतर "शेतकरी संघटक"च्या वाचकांसाठी या अंकापासून प्रकाशित करण्यास सुरुवात करण्यात येत आहे. मराठीतील स्वैर रूपांतराच्या कामात मोठे सहाय्य श्री. गोपाळराव परांजपे यांचे झाले आहे. प्रकाशित झालेल्या भागाविषयी वाचकांनी आपली मते, शंका जरूर कळवाव्यात.**

**— संपादक**

कृषिनीती स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्नच झाला नाही.

## चर्चासुद्धा नाही

७. याहीपेक्षा नवलाची गोष्ट, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेतीव्यवसायाची नेमकी भूमिका काय याबद्दल साधी चर्चासुद्धा झाली नाही. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली तेव्हा सुरुवातीला मक्याच्या आयातीसंबधीच्या कायद्यांच्या निमित्ताने मोठे वादविवाद व चर्चा झाली. रशियामध्येसुद्धा समजवादी नियोजनाच्या सुरुवातीला बुखारीन आणि प्रियाब्रेझेन्स्की यांच्यामध्ये अगदी उग्र वादविवाद झाला. या वादविवादाची निष्पत्ती स्टालिनच्या कृषिधोरणात झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या तिसऱ्या जगातील देशांमध्ये मात्र संकल्पित औद्योगिकीकरणासाठी भांडवलनिर्मिती होण्यास आवश्यक बचत तयार करणाऱ्या क्षेत्रांबद्दल लक्षात घेण्याजागी चर्चाच झाली नाही.

८. नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांत अशा चर्चेची काही गरज भासली नसावी. साम्राज्यवादी सत्तांनी वसाहतीतील शेतीचे शोषण करून मायदेशीच्या कारखानदारीला भांडवल पुरवठा करण्यासाठी उभारलेली रुळलेली यंत्रणा तयारच होती. शोषणाची ही यंत्रणा साम्राज्यवाद्यांच्या वतीने चालविण्याचा भरपूर अनुभव असलेल्या देशी मंडळींच्या हातीच स्वतंत्र देशाची सत्ता आली. पूर्वी शोषणाची जी यंत्रणा ते दुसऱ्यांच्या नावावर चालवीत होती ती स्वतःच्या नावाने चालवून पाश्चिमात्य स्वप्नसृष्टीचे देशी अवतार उभारण्याच्या कामाला ते लागले. या नवीन व्यवस्थेमुळे जुन्या राज्यकर्त्यांना आधी मिळत असलेल्या फायद्याला मुकावे लागले असेही नाही. किंबहुना तिसऱ्या जगातील राज्यकर्त्यांच्या आर्थिक योजना या जुन्या साम्राज्यवादी देशांतील नव्या औद्योगिक क्रांतीस पोषकच ठरल्या.

## नववसाहतवाद

९. नव्याने स्वतंत्र झालेल्या तिसऱ्या जगातील इतर देशांत जे घडले तेच भारतात. ज्या आर्थिक सिद्धांतांसाठी आपल्या राजकीय वारसाशीसुद्धा संघर्ष करण्याची गांधीजींनी तयारी ठेवली होती ते महात्माजींचे सिद्धांत फेकून देण्यात आले. औद्योगिकीकरण म्हणजेच विकास असे प्रमेय बनले. पाश्चिमात्य औद्योगिक समाजरचनेची देशी नक्कल म्हणजेच विकास असा अर्थ प्राप्त झाला. पण, शेती व्यवसाय आणि त्यातून मिळणाऱ्या अन्नधान्याशिवाय तर जगणे अशक्यच. त्यांचा विचार संपूर्ण टाळता थोडाच येतो? मग, शक्य तो कमीत कमी भांडवल गुंतवून शेतीव्यवसाय तगवून ठेवायचा; आणि जास्तीत जास्त भांडवल उद्योगक्षेत्राच्या वाढीसाठी उपलब्ध होईल अशी व्यवस्था आखायची असे धोरण.

राष्ट्रीय संरक्षणाची गरज, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या या युगाने दिलेली आव्हाने, विकासप्रक्रियेत असमतोलाची अपरिहार्यता इत्यादि समर्थने औद्यागिकीकरणाला दिल्या जाणाऱ्या या झुकत्या मापासाठी दिली गेली.

१०. शेती व्यवसायाबद्दल पद्धतशीरपणे पुतनाप्रेमाची नीती पाळली गेली. नियोजना-संबंधीच्या सर्व कागदपत्रांमध्ये आणि झाडून साऱ्या शासकीय घोषणांमध्ये शेतीव्यवसाय व शेतकरी यांची न विसरता स्तुती केली आहे. अन्नधान्य, कच्चा माल आणि श्रमशक्तीचा मूल स्रोत म्हणून शेतीव्यवसायाचे श्रेय मान्य करण्याचे कर्तव्य न चुकता पार पाडले आहे. पण त्याचवेळी शेतीकडे दुर्लक्ष करणेही चालू ठेवले. अंदाजपत्रक आणि नियोजनातील तरतुदींपैकी इतर क्षेत्रांतील मागणी भागवून उरलेसुरले शेतीव्यवसायामधील संरचना आणि तंत्रज्ञान यांची सुधारणा करण्यासाठी वापरले गेले; पण त्यातसुद्धा, वाढीव उत्पादनाचा सरळसरळ फायदा शहरी उच्चभ्रू आणि ग्रामीण भागातील सत्तेचे दलाल यांना व्हावा अशा मखलाशीने. शेतीतील उत्पादन व उत्पादकता तर सुधारायची पण फायदा मात्र बिगर शेतकऱ्यांना यावर कार्यक्रमाचा भर होता.

११. शेतीतील उत्पादन व उत्पादकता यांतील वाढ हा धोरणे आखणाऱ्यांचा आणि पुस्तकी पंडितांचाही अत्यंत आवडीचा विषय आहे. शेतकरी समाजाची उन्नती व्हावी अशी त्यांना तळमळ लागलेली आहे म्हणून हा विषय त्यांना आवडतो असे मात्र नाही. भांडवल-निर्मितीचे प्रमुख स्रोत असलेले अन्नधान्य आणि कच्चा माल स्वस्तात स्वस्त किंमतीत उपलब्ध व्हावा अशी त्यांनी मनीषा असते म्हणून तो त्यांच्या आवडीचा विषय आहे. शेतीमालाच्या देशांतर्गत किंमती आंतरराष्ट्रीय किंमतीच्या पातळीच्या खालीच राहात आल्या आहेत आणि देवघेवीच्या अटी शेतीक्षेत्राच्या बाबतीत इतक्या खालावू दिल्या आहेत की बाजारात आलेल्या शेतीमालापैकी बऱ्याच मोठ्या हिश्श्याला त्याच्या एकूण उत्पादनखर्चाच्या जेमतेम निम्मी किंमत मिळते. शेतीमालाच्या वाहतुकीवरील बंधने, सक्तीची लेव्ही वसुली, आयात-निर्यातीसंबंधी हातचलाखीची धोरणे, देशांतर्गत बाजारपेठेत आयात माल ओतणे, कृत्रिमरित्या कमी केलेली रुपयाची आंतरराष्ट्रीय किंमत इत्यादी अनेक साधनांचा वापर करून शेतीमालाच्या कमी किंमतीची व्यवस्था चालू ठेवली आहे.

## शेतकरीविरोधी गदारोळ

१२. या देशात शेतकऱ्यांकरिता आजपर्यंत खूप काही केले गेले आहे आणि पुढेही केले जाणार आहे असा आभास शासकीय अहवाल, प्रसारमाध्यमे तसेच पुस्तकीपंडितांच्या संमेलनांतील चर्चांद्वारे केला जातो. या देशातील शेतकरी खूप लाडावून ठेवला गेला आहे असे बरेच जण गंभीरपणे मानतात. मोठ्या प्रमाणावर उपाशी, अशिक्षित व बेरोजगार असलेल्या जनतेच्या शासनाने हरितक्रांतीच्या यशावर आत्मसंतुष्ट होऊन कृत्रिम धागे, इलेक्ट्रॉनिक्स, छोट्या मोटारगाड्या यासारख्या कमी औचित्याच्या आणि अत्यंत महागड्या क्षेत्रांकडे अधिक बिनदिक्कतपणे लक्ष द्यायला सुरुवात केली.

१३. शेतीविषयक धोरणावर साधकबाधक चर्चा करण्याऐवजी पुस्तकी अर्थशास्त्रज्ञांनी संशयास्पद आकडेवारी आणि गणिती हातचलाखीचा वापर करून शेतकऱ्यांविरुद्ध गदारोळ उठविण्याचा पवित्रा घेतला. असंतुलित विकासाची वकिली करणाऱ्या पंडितांच्या विकृत प्रमेयांना मान्यता मिळू लागली. उदाहरणार्थ, शेतकरी किंमतीच्या रूपातील आर्थिक प्रोत्साहनालाही प्रतिसाद देत नाहीत. शेतकऱ्याला प्रत्यक्ष मिळणाऱ्या किंमतीऐवजी घाऊक बाजारपेठेतील किंमतींचा निर्देशांक वापरून शेतीमालाच्या किंमतीतील वाढीमुळे ग्रामीण भागातील गरीबांनाच त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील अशी मांडणी केली जाऊ जागली. सोयीस्कर आधार वर्ष, संशयास्पद निर्देशांक आणि दोषास्पद तुलना यांचा हुशारीने वापर करून देवघेवीच्या शर्ती या प्रत्यक्षात शेतीव्यवसायाच्या बाजूनेच झुकलेल्या आहेत असा निष्कर्ष काढण्यात आला.

## वस्तुस्थिती : दारिद्य आणि दुजाभाव

१४. पुस्तकी पंडितांनी कितीही बौद्धिक मखलाशी केली असली तरी देशामध्ये तयार झालेली अर्थव्यवस्था आणि तीमुळे निर्माण झालेल्या दोन समाजांमधील वाढती आर्थिक दरी ही वस्तुस्थिती लपून राहिली नाही. एकीकडे, प्रामुख्याने शहरी भागांपुरताच मर्यादित असलेला पाश्चिमात्य जीवनशैलीचे अनुकरण करू पाहाणारा आधुनिक आद्योगिक समाज भरभराटीला येत आहे. तर दुसरीकडे, शतकानुशतके ज्यांच्या हालाखीच्या स्थितीत काहीच फरक झाला नाही असा प्रामुख्याने शेतकरी आणि कालबाह्य ठरलेले कारागिर यांचा प्रचंड मोठा ग्रामीण समाज अधिकच खचत चालला आहे.

१५. शेतीक्षेत्रासाठी संयंत्रणा आणि तंत्रज्ञानावर जो काही भर दिला गेला त्याने शेतीउत्पादनातील वाढीचा दर उंचावण्याचे प्राथमिक उद्दिष्टसुद्धा सफल झाले नाही. ओलिताची शाश्वती असलेल्या ज्या भागात हरितक्रांतीचा प्रयत्न झाला तेथे सुरुवातीला उत्पादनवाढीचा दर उंचावला पण नंतर तो वेगाने सपाट झाला. ओलिताची शाश्वती नसलेल्या इतर भागात हा प्रयोग करणे तर धार्ष्ट्याचेच ठरेल. अन्नधान्याच्या उत्पादनाच्या वाढीचा दर इतर अनेक देशांच्या तुलनेने कमीच राहिला आहे आणि गहू वगळता इतर धान्ये आणि कडधान्यांच्या उत्पादनवाढीची गती तर फारच कमी राहिली.

१६. बहुतेक सर्व खाद्यपदार्थांच्या दरडोई उपलब्धतेतील वाढ गेल्या सात पंचवार्षिक योजनांच्या काळात खुंटलेली आहे. आजच्या किंमतीमध्ये बिगर शेती क्षेत्रातील दरडोई उत्पन्न शेतीक्षेत्रातील दरडोई उत्पन्नाच्या सहा पटीइतके जास्त आहे. चाळीस वर्षांपूर्वी हे प्रमाण केवळ १:१.४ इतकेच होते. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीक्षेत्राचा हिस्सा ६० टक्के होता तो आता केवळ ३० टक्के इतका कमी झाला आहे. याच कालखंडात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मात्र ७० टक्क्यांच्या आसपास कायम राहिले आहे. केवळ आकडेवारीत बोलायचे झाले तर या कालखंडात शेतीवरील हालाखीचे जीवन जगणारांची संख्या २९ कोटीवरून ५८ कोटी झाली आहे; म्हणजे दुप्पट झाली आहे.

१७. अगदी काटोकोरपणे हिशोब केला तरी ग्रामीण लोकसंख्येच्या ४० टक्के लोक दारिद्यरेषेखालील जीवन जगत आहे. म्हणजे सुमारे २२.२ कोटी ग्रामीण लोकसंख्या दारिद्यरेषेखाली आहे. शहरी लोकसंख्येच्या २७.७ टक्के म्हणजे सुमारे ५ कोटी लोक जे दारिद्यरेषेखाली आहेत तेसुद्धा वास्तविकतः शेतीक्षेत्रात जगणे कठीण झाले म्हणून जगण्यासाठी शहरातील झोपडपट्ट्यांत स्थलांतरित झालेले शेतीक्षेत्रातील निर्वासितच आहे. या दारिद्याची धग सर्वदूर सारखीच असते असे नाही. कोरडवाहू आणि अंशतः कोरडवाहू प्रदेशांमध्ये, नैसर्गिक आपत्तींचा सतत समाना कराव्या लागणाऱ्या भागात, डोंगराळ आणि वाळवंटी भागात गरीबी अती खडतर असते. भाग कोणताही असो, त्यातील अनुसूचित जातीजमातीचे लोक, आदिवासी आणि सर्व थरांतील स्त्रियांची स्थिती पराकोटीच्या हालाखीची आहे.

१८. क्रूरपणे रणगाड्यांचा वापर करून रशियामध्ये अंमलात आणलेल्या स्टालिनच्या कृषिनीतीलासुद्धा कारखानदारीतील फायद्याचा रास्त हिस्सा रशियन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे श्रेय दिले जाते. भारतात मात्र एकतर्फीच प्रवाह राहिला. त्यातही, शेतकऱ्यांना नुकसानीत ठेवून जगविलेले कारखानदारीचे रोगट बाळ सतत अधिकाधिक भांडवलासाठी आक्रोश करीत राहिले. कारखानदारीसाठी लागणारे भांडवल शेतीचे शोषण करून जमा केले आणि तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री परदेशातून आणली. या कारखानदारीने ज्या वस्तू तयार केल्या त्या गरीबीने गांजलेल्या बहुसंख्य जनतेच्या क्रयशक्तीबाहेरच्या आहेत. याचे आर्थिक दुष्परिणाम अपरिहार्यच आहेत. उदाहरणार्थ, एकीकडे साधे कापड विकत घेण्याची क्षमता नाही म्हणून कोट्यावधी पुरुष, स्त्रिया आणि मुले अक्षरशः अर्धनग्न अवस्थेत रहात आहेत तर दुसरीकडे कारखानदारीने तयार केलेली उंची वस्त्रे विकत घेण्यासाठी श्रीमंतांना उद्युक्त करावे यासाठी अतोनात खर्चिक अशी जाहिरातबाजी केली जाते. देशातील सर्वसामान्यांच्या मूलभूत व तातडीच्या गरजाा भागलेल्या नसतांनासुद्धा त्यांच्याच शोषणातून उभ्या राहिलेल्या कारखानदारीने तयार केलेला माल सर्वसामान्यांच्या क्रयशक्तीच्या आवाक्याबाहेर असल्याने मिळेल त्या किंमतीत परदेशी बाजारपेठेत ढकलावा लागतो.

## समाज-अर्थशास्त्रीय परिणाम

१९. विकासाच्या पद्धतीची परिणती मोठ्या प्रमाणावरील बेरोजगारी, दारिद्य, निरक्षरता, असंतुलित शहरीकरण, झोपडपट्ट्यांची वाढ, आर्थिक व तंत्रज्ञान दोन्ही बाबतीत परदेशांवर अवलंबन, देशांतर्गत व परदेशी कर्जाचे सापळे, भ्रष्टाचार आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण यांमध्ये झाली आहे. राष्ट्रपित्याने आपल्या मनात बिंबविलेली विकासाच्या मार्गाची जाणीवच आपण हरवून बसलो आहोत. कोण्या एखाद्या विशिष्ट नियोजन पद्धतीवर नव्हे तर "नियोजन" या संकल्पनेवरच जनतेचा विश्वास उरलेला नाही. लोकशाही पद्धतीने संपूर्ण देशाचे पुनरुज्जीवन होण्याची त्यांच्या मनातील आशा मावळू लागली आहे. जे अजूनही थोडेफार कर्तृत्व शिल्लक असलेले आहेत ते आपले कर्तृत्व आपल्या स्वतःच्या, कुटुंबाच्या, जातीच्या, धर्माच्या, विभागाच्याआणि भाषेच्या फायद्याचे घोडे पुढे दामटण्यासाठी वापरीत आहेत. संकुचित विचारांच्या जहरी प्रचाराला गरीब आणि निराशाग्रस्त जनता सहजी बळी पडते याचा फायदा उठवून क्षुद्रवादी शक्ती देशाचे तुकडे पाडतील असा धोका निर्माण झाला आहे. महात्माजींच्या अर्थनीतीच्या विरुद्ध अर्थनीती अंगिकारण्याचे कटू फळ देशाला भोगावे लागत आहे. प्रचलित अर्थव्यवस्था यापुढेही अशीच चालत राहिली तर एकविसाव्या शतकाच्या पहिल्या काही वर्षातच भारत हा एक अत्यंत दरिद्री आणि समाजविघातक लोकांचा देश बनलेला असेल आणि जनतेतला अंतर्विरोध व कलह सुधारण्यापलिकडे पराकोटाला गेलेला असेल.

२०. दुहेरी समाजव्यवस्थेच्या या विषवृक्षाच्या शाखा देशाच्या जीवनाच्या सर्व अंगोपांगात आतापासूनच दिसू लागल्या आहेत. त्यातील काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

– प्रशिक्षित तंत्रज्ञांच्या संख्येत भारत जगामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. याच भारत देशात अक्षरओळखीची संधीसुद्धा न मिळालेल्या स्त्रीपुरुषांची संख्याही सर्वात जास्त आहे. उच्च शिक्षणाच्या संस्था उच्च प्रशिक्षणासाठी जी साधनसंपत्ती वापरतात तिचा उपयोग जर ग्रामीण भागात प्रत्यक्षात काम करणाऱ्या कारागिरांचे आणि आरोग्यसेवकांचे कौशल्य आणि क्षमता टप्याटप्याने वाढविण्यासाठी केला

तर अधिक फलदायी ठरू शकेल. आजच्या शिक्षणसंस्थांतून तयार होऊन बाहेर पडणारे शहरी लोक हे संपत्तीच्या आशेने विकसित राष्ट्रांमध्ये निघून जातात आणि इकडे मात्र विस्तृत ग्रामीण भाग अरोग्य आणि दळणवळण, शिक्षण आदिच्या बाबतीत प्राथमिक सोयींपासूनसुद्धा वंचित राहतो.

– लांबवर मालवाहतुकीच्या क्षेत्रात आता आगगाडीला महत्त्व दिले जात नाही; तिची जागा रस्त्यांवरील आणि त्यातल्या त्यात खाजगी वाहतुकीने घेतली आहे. या रस्त्यांच्या विकासाची योजनासुद्धा शहरी केंद्रांच्या गरजेपुरतीच मर्यादित असते आणि लाखो खेडी पक्क्या सडकांच्या अभावी जवळजवळ सबंध वर्षभर जगापासून तुटलेलीच राहातात. पेट्रोलियम पदार्थांच्या संभाव्य तुटवड्यामुळे ही ऊर्जाखाऊ वाहतूक व्यवस्थासुद्धा धोक्याच्या पायरीवर उभी आहे.

– एखादे अल्पकालीन युद्ध समोर ठाकले तर प्रमुख शहरांचे संरक्षण करता यावे यासाठी महागड्या व उच्च दर्जाच्या साधन- सामुग्रीची जमवाजवम करणे इतपतच राष्ट्राच्या संरक्षणसज्जतेचा अर्थ आहे. प्रसंग आल्यास गावागावाचे संरक्षण कसे करावे यावर विचारच होत नाही. आजसुद्धा प्रत्यक्ष आघाडीवर लढणारे जवान हे शेतकरी / ग्रामीण कुटुंबातलेच असतात तर अधिकारी मात्र शहरी आणि शिक्षित समाजातून आलेले असतात.

– कारखानदारीला उत्तेजन देण्याच्या नावाखाली उभ्या केलेल्या गुंतागुंतीच्या यंत्रणेमुळे लायसेन्स-परमिट-कोटा छाप अधिराज्य स्थापन झाले आहे आणि नोकरशाहीचा पसाराही इतका वाढला आहे की देशाच्या वार्षिक अंदाजपत्रकी तरतुदींतील आणि कोणत्याही प्रकल्पाच्या तरतुदतील दोन तृतीयांशाहून अधिक हिस्सा ही नोकरशाहीच हडप करून टाकते.

– कायदासुद्धा ग्रमीण व शहरी भागांमध्ये दुजाभाव राखतो असे दितसे. शेतीउत्पादनांच्या बाबतीत लावला गेलेला जीवनावश्यक वस्तूंसंबंधीचा कायदा औद्योगिक उत्पादनांना लावण्याचा विचारसुद्धा शासनाला शिवत नाही. कमाल जमीन धारणेच्या कायद्यात केलेली कुटुंबाची व्याख्या तर्कशून्य आणि व्यक्तीच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करणारी तर आहेच पण त्याचबरोबर पितृप्रधानतेवर सरळसरळ शिकामोर्तब करणारी आहे. दिवाणीच नव्हेतर तर फौजदारी कायदेसुद्धा (शाब्दिक मांडणीत नसले तरी) अंमलबजावणीत शहरी भागाला झुकते माप देतात. फाशीची शिक्षा झालेल्यांच्यात ग्रामीण भागातील लोकांचा भरणा जास्त असतो. शहरी भागातले सुशिक्षित गुन्हेगार खून करूनसुद्धा अक्षरशः सहीसलामत सुटू शकतात.

## महात्म्याचा मंत्र

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान म्हणाले होते, "नियतीशी गाठभेट ठरलेली आहे." ही गाठभेट बिघडली कुठे? अंतर्मुख होऊन या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची ही कदाचित शेवटची घडी आहे. महात्माजींनी सांगितलेला मंत्र यासाठी मार्गदर्शक असणे हेच स्वाभाविक ठरेल. सगळ्यात जास्त नागवल्या गेलेल्या आणि अगदी तळागाळातल्या समाजाला देशातील या सर्वच परिस्थितीबद्दल काय वाटते? तो आपली उपजिविका कशी करतो? कमरेचा काटा ढिला होइपर्यंत रात्रंदिवस राबराबूनसुद्धा त्यांना पोटाची खळगी भरणेसुद्धा का शक्य होत नाही? हा प्रश्न आपल्याला सर्व विकासप्रक्रियेच्या मूळ गाभ्यापाशी आणून सोडतो. श्रमशक्तीचा वापर म्हणजेच, थोडक्यात, आपली शेतीसंबंध ीची नीती होय.

२२. शेतीत वापरली गेलेली श्रमशक्ती ही सर्व आर्थिक विकासाच्या उगमस्थानी असते. शेतीक्षेत्रातील श्रमशक्तीच्या वापराने तयार होणारी बचत (Surplus) वापरून औजारे, संरचना व व्यवस्थापनाची निर्मिती होते व त्यायोगे शेतीची उत्पादकता वाढण्याची प्रक्रिया सुरू होते. शेतीक्षेत्रातील बचतीतूनच दुय्यम व तिय्यम क्षेत्रातील व्यावसायिक विविधता व विकास साकार होत असतात. आपल्या देशाच्या लोकसंख्येचा बराच मोठा हिस्सा शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेती हेच विकासासाठी केलेल्या कोणत्याही प्रयत्नांच्या केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. शेतीक्षेत्राला डावलून जरी काही आर्थिक प्रगती शक्य असली तरी त्याला विकास म्हणता येणार नाही कारण त्याचा लाभ बऱ्याच मोठ्या लोकसंख्येच्या वाट्याला आलेलाच नसेल.

२३. शेतीक्षेत्रात तयार होणारी बचत सतत वाढत राहाण्यास उत्तेजन देणे आणि त्या बचतीचे वितरण अशा तऱ्हेने करणे की तिच्या विनियोगाने उत्पादक घटकांचा जास्तीत जास्त वापर होईल आणि जनतेच्या गरजा सर्वमान्य अग्रक्रमानुसार भागविल्या जातील हा खरा, पुस्तकीपंडितांच्या जीवघेण्या मायावीपणापासून मुक्त अशा नियोजनाचा अर्थ आहे. आता नवीन जमिनी लागवडीखाली आणण्याची शक्यता नगण्यच असल्यामुळे सिंचनसुविधांचा विस्तार करणे, पाण्याच्या उपलब्ध स्रोतांचा वापर सुधारणे, औजारे, यंत्रे, बियाणी, खते, पद्धती इत्यादींमध्ये सुधारणा करून आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांमध्ये त्यासाठी प्रेरणा निर्माण करूनच शेतीतून वाढती बचत निर्माण करणे शक्य आहे. वाहतूक, दळणवळण, साठवणूक, पणन, प्रक्रिया, पतपुरवठा इत्यादी संयंत्रणात्मक व्यवस्थांमध्ये यथावकाश व आवश्यक तेथे सुधारणा घडवून आणून या वाढीव बचतीचा यथायोग्य असा विनियोग होऊ लागेल. यातूनच शेती आणि बिगरशेती क्षेत्रांचे परस्परपूरक चक्र तयार होईल. उदाहरणार्थ, शेतीक्षेत्रासाठी औजारे, खते, औषध े, बियाणे, इतर साधने एकीकडे तर त्यामुळे तयार होणाऱ्या वाढीव बचतीसाठी संरचनेला आवश्यक यंत्रसामुग्री आणि साधनांची निर्मिती होऊ लागेल. या सर्व अग्रक्रमाच्या बाबी आहेत. त्या व्यतिरिक्त प्रकल्प अग्रक्रम भागवून बचतीतील काही उरले तर विचारात घेतले जातील.

२४. महात्माजींनी दिलेल्या विकासमंत्राच्या मार्गदर्शनाखाली विकासाच्या आराखड्याचे हे तर्कशास्त्र म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात या देशात वापरलेल्या आराखड्यापासून बव्हंशी फारकत घेणे असे आहे. अविकसितपणा हे, काही दुष्टचक्र आहे किंवा नैसर्गिक अवस्था आहे असे महात्माजींनी कधीच मानले नाही. त्यांच्या विकासाच्या आराखड्यात विकास ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे इतकेच नव्ह तर ती सन्मानाची आणि आनंदाची अनुभूती देणारी बाब आहे. काही विशिष्ट गटाचाच स्वार्थ साधण्याचा छुपा कार्यक्रम असेल तर विकासाची प्रक्रिया असाध्य व क्लेशदायी होऊ शकते. विकासाच्या या नव्या आराखड्यात गरीब आणि पददलितांचा उद्धार करण्यासाठी काही खास भव्य कार्यक्रम राबविण्याची आवश्यकताच राहाणार नाही. महात्माजींनी म्हटल्याप्रमाणे, इतर काहीही न करता शासन "गरीबांच्या पाठीवरून उतरले" तरी ते पुरेसे आहे.

२५. शासनाने आजवर अंगिकारलेल्या विकासाच्या आराखड्याचा सारांश पुढीलप्रमाणे

शेतीतून बचत – शहरी भागात भांडवलसंचय – तंत्रज्ञान व यंत्रसामुग्रीची आयात – अत्यल्प रोजगार – उत्पादित मालाला अपुरी मागणी, त्याबरोबरच खालावलेले जीवनमान – परदेशांवरील अवलंबन – विकासाची कुंठीत गती.

आणि महात्मा गांधींच्या विकास आराखड्याचा सारांश –

शेतीतून बचत – ग्रामीण केंद्रांत / खेड्यांत भांडवलसंचय – शेतीत अधिक उत्पादन, अधिक गुंतवणूक, अधिक मजुरी – स्वावलंबी खेडी – योग्य स्तराच्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने बिगरशेती उद्योगांची निर्मिती – औद्योगिक मालाला सार्वजनिक भरीव मागणी – समृद्धी आणि विकासाचे स्वावलंबी चक्र.

**(क्रमशः)**

# तहसील कार्यालयावर बैलबंडी मोर्चा

यवतमाळ जिल्ह्याच्या नेर तहसील कार्यालयावर नेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी बैलबंडी मोर्चा नेऊन तहसीलदारांना शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन दिले. निवडणूक प्रचाराचा काळ असूनसुद्धा या मोर्चात २०० बैलबंड्यांसह सुमारे १५०० पुरुष व १५० महिला शेतकऱ्यांनी भाग घेतला.

या मोर्च्याच्या तयारीसाठी कार्यकर्त्यांनी केवळ २ मोटार सायकलींच्या साहाय्याने दोनच दिवस गावोगाव प्रचार केला. गावागावात स्त्रीपुरुषांनी आम्हाला निवडणुकीचे महत्त्व नाही पण आमची दर १०० रुपयांमागे जी ५० रुपयांची लूट होते आहे ती थांबवायची आहे, त्यासाठी आम्ही मोर्चाला येणारच असा निर्धार व्यक्त केला.

मोर्चाचे नेतृत्व श्री. विजय जावंधिया यांनी तर संचालन श्री. नितीन देशमुख यांनी केले. कापसाच्या बोनसमधून होणारी २५ टक्के कपात बंद झाली पाहिजे, ३ टक्के कपात बंद करा, शेतकरी संघटनेचा विजय असो, शरद जोशी झिंदाबाद, शरद जोशी कृषिनीती अमलात आलीच पाहिजे अशा घोषणा देत हा मोर्चा कॉटनमार्केट जवळून निघाला आणि तहसील कार्यालयासमोर त्याचे सभेत रूपांतर झाले. सभेसमोर सर्वश्री विजय जावंधिया, खान गुरुजी, किशोर माथनकर, महादेवराव गुघाने व सौ. संध्या इंगोले यांची भाषणे झाली. नंतर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

या कार्यक्रमाकरिता तालुक्यातील सर्वश्री बबन चौधरी, पुरुषोत्तम भांडारकर, मारोतराव काळे, चंद्रशेखर देशमुख, गजाननराव गोळे, ॲड. दिलीप देशमुख, मोहन गोळे, सौ. प्रभाताई इंगोले, सौ. चुटके, सौ. फिरके इत्यादी स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

**(प्रेषिका : सौ. संध्याताई इंगोले)**

## शेतकरी तितुका एक एक
## भीक नको हवे घामाचे दाम

### शेतकरी संघटक

शेतकरी आणि शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांच्यातील संपर्काचा एकमेव दुवा.

शेतकरी संघटक नियमित वाचा आणि आपल्या शेतकरी भावाबहिणींना त्यातील विचार समजावून सांगा.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 24th June, 1991

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
June 21, 1991

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment **No. 87**

**(पान ६ वरून)**

तांदळाला भाव नाही. टॅक्टर दुरूस्ती खर्च, डिझेल खर्च, डिझेलचे वाढलेले भाव याची सर्व झळ शेतकऱ्यांनाच पोहोचते. ते म्हणतात, आम्ही खर्च लावून लावून खूप त्रासून गेलो आहोत. आम्ही गहू विकतो तेव्हा आम्हाला फक्त २२५ रुपये दर क्विंटलला मिळतात आणि विकत घ्यायला जातो तेव्हा मात्र ३६० रुपये द्यावे लागतात.

पंजाबमधील एकही महिला आंदोलनात सहभागी झाली नव्हती. त्या केव्हाच घराबाहेर पडत नाहीत असे ऐकण्यात आले. तसेच तिथे १५ ते ३० वर्षांच्या दरम्यान वयाचा मुलगाही आंदोलनात सामील झालेला दिसला नाही. याचे कारण विचारले असता पंजाबमधील शेतकऱ्यांनी सांगितले की आमचा मुलगा सकाळी घराबाहेर पडला तर व संध्याकाळी परत आला नाही तर आम्हाला भीती वाटते. कारण की, अशा कित्येक तरुणांना तुरुंगात टाकले आहे, काहींना गोळ्या घालून मारले आहे.

हरियाणातील शेतकरीसुद्धा कर्जबाजारीच आहे. आमच्या आंदोलनात सुभाषचंद्र बोसांच्या आझाद हिंद सेनेत असलेले शेतकरीही होते. हरियाणातील शेतकरी २०/२५ च्या गटाने वर्तुळाकार बसून हुक्का पीत असत. 'ताऊ देवीलालने आजपर्यंत आपल्याला खूप फसवले, खोटी आश्वासने दिली' अशा त्यांच्या गप्पा चालत.

हरियानातील ४० महिला आंदोलनात सामील झाल्या होत्या. १७ मे रोजी सौ. किष्णी देवी (हरियाना) सौ. संध्याताई इंगोले, सौ. सुमनताई अग्रवाल (महाराष्ट्र) व सौ. इलाबेन पटेल (गुजरात) यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राजभवनावर सत्याग्रह केला व अटक करवून घेतली.

सौ. किष्णीदेवी यांनी तुरुंगात केलेल्या भाषणातून स्त्रियांच्या समस्या व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, "आमच्या दुःखासाठी डोक्यावर गाठुडं बांधून जेलमधे आलो. आम्ही स्त्रिया पुरुषांबरोबर शेतात काम करतो, घरी घरचं सांभाळून गुराढोरांची कामं आम्हाला करावी लागतात. आज आमची परिस्थिती अशी आहे की आमच्या मुलीचं लग्न एखाद्या नोकरीवाल्यासोबत व्हावं म्हणून चपराशी मुलगासुद्धा बघतात पण पाच लाखाच्या जमिनीच्या शेतकऱ्याच्या घरी देण्यास भितात. कारण अशा शेतकऱ्यालासुद्धा धड दोन वेळचे जेवणसुद्धा पोटभर मिळत नाही, तो दोन ड्रेसशिवाय वर्षभर कपडे शिवू शकत नाही. जेव्हा जेव्हा शरद जोशी आम्हाला आदेश देतील तेव्हा आम्ही हरियाणातील स्त्रिया आंदोलनात सहभागी होऊ."

तुरुंगात गीता अग्रवाल हिने म्हटलेल्या "हम किसान, देश की शान, जीने से बेजार है।" या गाण्याने पंजाब व हरियाणातील शेतकऱ्यांच्या डोळ्यातून पाणी येत असे. बऱ्याच जणांनी हे गाणे आमच्याकडून लिहून घेतले.

तुरुंगातून सुटल्यानंतर पंजाबातील शेतकऱ्यांनी आम्हाला दोन दिवस आपल्या गावी नेऊन आमचा पाहुणचार केला.

*पोरांनो, रामरायानेच वाचवले रे,*
*मी तर घाबरूनच गेलो होतो*
*दिल्लीवर भगवा फडकला तर*
*शेतं पण भगवी करतात की काय म्हणून.*
*आता या पुढं तरी सावध राहा,*
*कोणत्याही रंगाची भुतं*
*गावशिवारात घुसू देऊ नका.*

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**